# रामायणाचा तमाशा बनवलाय

भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रात प्रभू श्रीरामाला मोठे स्थान आहे. आपल्याकडे ३३ कोटी देव आहेत. पण या सर्व देवांत प्रभू श्रीरामाला समाज जितके अधिक हृदयाशी धरेल तितका समाजाचा विकास होईल असे मानायला हवे. श्रीराम हे असे दैवत आहे ज्याने मानव रूपात असंख्य चुका केल्या असूनही त्याला देवाच्या स्थानी मानले गेले. कारण हा एकच देव असा आहे ज्याने अपार शक्ती असूनही कधीही कायद्याचे उल्लंघन केले नाही. समाज व्यवस्था उत्तम राहिली तरच विकास होतो आणि समाज व्यवस्था उत्तम राहायची असेल तर समाजात कायदा सर्वात उच्चस्थानी मानला गेला पाहिजे. राजा असो वा रंक, प्रभू असो वा सामान्य माणूस सर्वांना कायदा एकच हा आदर्श श्रीरामाने घालून दिला. म्हणून श्रीराम मर्यादा पुरुषोत्तम ठरला आणि कायद्यानुसार प्रशासन चालविल्यानेच श्रीरामाने सुराज्य प्रस्थापित केले.

आज दुर्दैवाने एका निवडणुकीसाठी त्या मर्यादा पुरुषोत्तमाचे मंदिर उभारायला कायदाच धाब्यावर धरण्याची योजना सुरू आहे. श्रीरामाने घालून दिलेला आदर्शच पायदळी तुडवला जाणार असेल तर रामाच्या जन्मस्थळी राम मंदिर उभारून उपयोग काय? सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत न थांबता कायद्याची मोडतोड करून राम मंदिर उभारलेही जाईल, पण मग रामराज्य कसे येणार? मनमानी कारभार करणारा राजा, समाज, हुकूमशहा किंवा कुटुंबप्रमुख कुणीही असो, तो समाजाचे भले करू शकत नाही. स्वराज्य आणि सुराज्य दोन्ही स्थापन करायची असतील तर कायद्याचेच राज्य हवे. प्रभू श्रीराम आणि छत्रपती शिवाजी महाराज यांनी हाच आदर्श आपल्यापुढे ठेवला. म्हणूनच आपण इतक्या वर्षांनंतरही त्यांची आठवण काढतो. त्यांनी सुशासनाने समाजाला जे सुख दिले त्याचा हलका स्पर्शही आपल्याला आनंद देतो. दुर्दैवाने निवडणुकांच्या नादाला लागून आपण रामायणाचा तमाशा बनवू लागलो आहे. निदान तरुणाईने तरी या नशेत बुद्धी गहाण टाकू नये असे वाटत होते. पण विकासासाठी मतदान करणारी ही तरुणाई फार मोठ्या संख्येने अयोध्येच्या वाटेवर 'मंदिर बनाएंगे' म्हणत आरोळ्या ठोकताना दिसली आणि खरोखर दुःख झाले.

भारताची ताकद ही आहे की जगभरात भारत हा सर्वाधिक तरुण असलेला देश बनणार आहे. या



तरुणाईने ठरविले तर भारत विकसित देशांत शक्तीचे स्थान मिळवू शकेल. पण त्यासाठी विकास हे एकच ध्येय असायला हवे. कोणतेही ध्येय गाठायचे तर श्रम आणि श्रद्धा यांचेच पाठबळ लागते. या दोन्हींचा समतोल असेल तर योग्य दिशेने पाऊल पुढे पडते. मात्र हा समतोल बिघडला तर मार्ग चुकतो. आज दुर्दैवाने मार्ग चुकत चालला आहे. भारत म्हटले की हत्तीचा आणि नागांचा देश असे परदेशी पाहुणे मानत होते. पण गेल्या ६० वर्षांत भारताने प्रगती केली आणि आपल्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलू लागला. हाच वेग कायम ठेवायला हवा. परंतु या निवडणुकीने या वेगाला नुसता ब्रेक लागला नाही तर प्रगतीचा गाडा

**संपादकीय**
**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

मागे ढकलला आहे. आणखी दहा वर्षांनी भारताला पुतळ्यांचा आणि मंदिर, मनोऱ्यांचा देश म्हणून जग ओळखू लागले तर चालेल का? आंध्र प्रदेशात जगातील सर्वात उंच विधानसभा इमारत बांधली हे भूषण आहे की आंध्र प्रदेशात एकाही शेतकऱ्याने आत्महत्या केली नाही हे महत्त्वाचे आहे? छत्रपती शिवाजी महाराज, सरदार पटेल, श्रीरामाची स्मारके उभारावी का? उभारली पाहिजेत. पण त्यात उंचीची चढाओढ कशासाठी? राज्याचे आर्थिक गणित कोलमडेल इतके कर्ज काढून आमची मूर्ती सर्वात मोठी असे म्हणण्यात कसले शहाणपण आहे? उंचीवरून चढाओढ करीत आपल्या आदर्शांचा आपणच अपमान केला. त्यानंतर राम मंदिर उभारणीचा प्रश्न आघाडीवर आणला गेला. शिवसेना, विश्व हिंदू परिषद अशा सर्वच संघटनांनी या विषयात उडी घेतली आहे. त्यांच्या हेतूबद्दल, श्रद्धेबद्दल इथे उहापोहच करायचा नाही. निवडणूक जवळ आली की जे राजकारण चालते त्यावरही चर्चा करायची नाही. राम मंदिर वाद आणि प्रचार यात फार मोठ्या संख्येने सहभागी झालेली तरुणाई ही आज सर्वात मोठी समस्या आहे. शिवसेनेचा दौरा असो, रामाची आरती असो नाहीतर विश्व हिंदू परिषदेची धर्मसभा असो, सर्वत्र तरुणांची गर्दी दिसते. घरातील देवापुढे दोन मिनिटेही हात जोडून उभी न राहणारी ही तरुणाई यात का सामील आहे? श्रद्धा हा त्यांच्यासाठी अगदी महत्त्वाचा विषय असेल तर मग नोकऱ्या मिळत नाहीत हा महत्त्वाचा विषय नाही का? नोकरीसाठी आंदोलनात तरुण का उतरत नाहीत? सरकारी दवाखाने उघडावे, शाळांचा दर्जा सुधारावा, स्वस्त घरे बांधली जावी, शेतकऱ्यांच्या मालासाठी चांगला भाव मिळावा, दुधात भेसळ होऊ नये, वृद्धाश्रमात चांगली सोय असावी यापैकी कोणताच प्रश्न महत्त्वाचा नाही का? हे प्रश्न सोडविण्यासाठी तरुणाई इतक्या मोठ्या संख्येने कधीच रस्त्यावर उतरत नाही. नव्या पिढीला सकाळी ९ ते रात्री ९ राबवतात, कधीही नोकरीवरून काढतात, कंत्राटी ठेवतात या समस्याही महत्त्वाच्या नाहीत का? मग यासाठी रस्त्यावर का येत नाही? 'पहले मंदिर फिर सरकार' यात तुम्हाला इतका रस का? राम मंदिर बनणारच हे गळ्याच्या शिरा ताणून म्हणता तितक्याच त्वेषाने नोकऱ्या निर्माण करा असे का म्हणत नाही? समाजाच्या हिताचे आंदोलन असते तेव्हा त्यात हाताच्या बोटावर मोजता येतील इतकेच तरुण असतात. गळ्यात भगवे स्कार्फ आणि डोक्यावर भगवी टोपी घालून मोटारसायकलवर फिरण्यात अधिक शान वाटते का? शिवजयंतीला छत्रपतींसारखी दाढी ठेवून टिळा लावला की आभाळ ठेंगणं वाटतं का? पाडव्याला रांगोळ्या काढल्या की संस्कृती रक्षणाचं फिलिंग येतं का? लव्ह यू बाप्पा म्हटलं की विकसित झाल्यासारखं वाटतं का? कीव येते अशा तरुणाईची जी अयोध्येत दिसली, जी फक्त पाडव्याला घराबाहेर पडते आणि शिवजयंतीला पोवाडे ऐकून डोळ्यांत पाणी आणते. कीव येते अशा तरुणाईची जिला दिखावा आणि सत्य यातला फरक कळत नाही. या अशा तरुण पिढीच्या भरंवशावर आम्ही भारताच्या विकासाची स्वप्ने कशी बघणार? कुणीतरी हनुमान बनून प्रभू श्रीरामाने राज्य कसे केले हे समजून घेतले तरच रामराज्य येईल. अन्यथा दिशाहीन तरुणाई आणि निवडणुका या डोहात देश गटांगळ्या खात राहील.